महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
CIN: U40109MH2005SGC153645

मुख्य महाव्यवस्थापक कार्यालय (प्र व सु)
प्रशिक्षण व सुव्यवस्था, म.रा.वि.वि.कं.म.,
चेमरी नं. १, एनटीपीएस कॉलनी, एकलहरे,
नाशिक (महाराष्ट्र) - ४२२ १०५

ISO 9001:2008
दुरध्वनी क्र. ०२५३- २८१००४० (का)
२८१२९४४(वै), फॅक्स - २८१०१७५
ई मेल : cetrd@mahadiscom.in
nashiktrainingcentre@gmail.com

जा.क्र. मुमव्य/प्रवसु/एकलहरे/नाशिक ८५ दिनांक : २१/०३/२०१६

**परिपत्रक**

**विषय : अमरावती येथे नवीन परीक्षा केंद्र सुरु करणे बाबत.**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी व महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कंपनी मर्या. या तीनही कंपन्यामध्ये कार्यरत पात्र कर्मचाऱ्यांच्या व्यावसायिक परीक्षा, निम्नस्तर सामान्य प्रशासन विभाग परीक्षा, उच्चस्तर सामान्य प्रशासन विभाग परीक्षा, निम्नस्तर लेखा परीक्षा, उच्चस्तर लेखा परीक्षा, मराठी भाषा परीक्षा या परीक्षा आतापर्यंत मुख्य महाव्यवस्थापक प्रशिक्षण व सुरक्षा विभाग एकलहरे, नाशिक परीक्षा विभागामार्फत फक्त नाशिक येथे घेण्यात येतात. या तीनही कंपन्याचे भौगोलीक कार्यक्षेत्र विचारात घेता कर्मचाऱ्यांच्या सोयी करीता दुसरे परीक्षा केंद्र सुरु करावे असा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता. त्यानुसार

१. मा. व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (संचलन), आणि संचालक (वित्त) यांच्याशी विचार विनिमय करुन अमरावती येथे नवीन परीक्षा केंद्र सुरु करणे बाबत मंजुरी प्रदान केली आहे.
२. प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र अमरावती हे या कार्यालयाच्या निर्देशानुसार परीक्षा समन्वयाचे काम पाहतील.
३. परीक्षेच्या अनुषंगाने असलेले सर्व प्रशासकीय कामकाज पुर्वी प्रमाणेच परीक्षा विभाग, प्रशिक्षण व सुरक्षा केंद्र एकलहरे, नाशिक या कार्यालयाकडुन केले जाईल. विभागीय परीक्षेच्या मुळ स्वरुपात / पध्दतीत कोणताही बदल होणार नाही.
४. परीक्षार्थींना नाशिक आणि अमरावती या दोन्ही परीक्षा केंद्रांपैकी एका केंद्राची निवड करता येईल.
५. सदर प्रशासकीय परिपत्रक निर्गमित केलेल्या तारखे पासुन अमलात येईल.

सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. महानिर्मिती व महापारेषण कंपनी सदर परिपत्रक आपल्या स्थरावर त्यांच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करतील.

(कां. वि. अजनाळकर)
मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु)
एकलहरे नाशिक

**प्रत सविनय सादर:**
कार्यकारी संचालक (मा.सं), महावितरण / महानिर्मिती / महापारेषण, मुंबई.

**प्रति,**
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादी प्रमाणे.